**महापालिका आयुक्त कार्यालय,**
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:मआ/साप्रवि/आस्था-४/२७६५
दिनांक :- ०६/०७/२०२०

-: **आदेश** :-

**विषय:** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी, सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे नियुक्तीबाबत.

**संदर्भ** : १) उप आयुक्त (झोनिपु) कार्यालय, जा.क्र.मआ/उआ/ झोनिपु/३/८२४ दिनांक २८/०८/२०१५
२) मा. महापालिका आयुक्त, ठराव क्र.१/७२४,दिनांक : ०६ /०७ /२०२०.

विषयाचे अनुषंगाने संदर्भ क्र. १ अन्वये कार्यालयीन आदेश यापूर्वी प्रसृत केलेले आहेत. तथापि, पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध विभागातील कामाचा वाढता व्याप व प्राप्त होणाऱ्या माहिती अधिकार अर्जांचा विचार केल्यास संबंधित विभागांमध्ये अधिक विकेंद्रित पद्धतीने हे अधिकार प्रदान करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त होत असलेल्या प्रथम अपिल अर्जांवरील सुनावणी व निर्णय विहित मुदतीत देणे आवश्यक असल्याने, विषयांकित कामकाजाचे काहीप्रमाणात विकेंद्रीकरण करणे, काही जबाबदाऱ्या निम्न पदांवरील अधिकाऱ्यांकडे सोपविणे असे निर्णय घेण्याची निकड निर्माण झालेली आहे.

त्यानुषंगाने खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत,

१) संदर्भ क्र. १ चे आदेश या आदेशान्वये सुधारित करण्यात येत आहेत.

२) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी, सहाय्यक जनमाहिती अधिकारी पदांचे संपूर्ण कामकाज/जबाबदाऱ्या सोबतचे परिशिष्टात निर्देशित केलेल्या पदावरील अधिकारी यांचेकडे सोपविल्याचे आदेश खाते/विभागस्तरावरून त्वरित प्रसृत करावेत.

३) प्रत्येक खात्याकडील/ उपविभागातील शक्यतो वर्ग- अ/ब मधील अगर उपलब्ध नसल्यास वर्ग- क मधील पे बँड ९३००-३४८०० आणि ४३०० ग्रेड वेतन या पेक्षा